# कपाशीवरील फुलकिडी आणि पांढऱ्या माशीचे एकात्मिक व्यवस्थापन

डॉ. भैय्यासाहेब गायकवाड
किटकशास्त्रज्ञ तथा सहप्रकल्प अधिकारी

श्री. कुंडलीक सांगळे
यंग प्रोफेशनल IRM प्रकल्प
कृषि विज्ञान केंद्र, खामगाव

डॉ. हनुमान गरुड
विषय विशेषज्ञ

**फुलकिडे:** हि कीड फिकट पिवळसर रंगाची असून अत्यंत बारीक असते. त्यांच्या पंखाच्या कडा केसाळ असतात. सर्वसाधारणपणे हे किडे पानाच्या मागच्या बाजूस आढळतात व पानाचा वरचा पापुद्रा खरवडून अन्नरस शोषण करतात. त्यामुळे पाने निस्तेज होतात व त्यामुळे पांढुरके व नंतर तपकिरी दाग दिसू लागतात. प्रादुर्भाव जास्त झाल्यास पानाची गळ होते. दिर्घकाळ कोरडे व उष्ण हवामान राहिल्यास व पावसाने दांडी मारल्यास ह्या किडीचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढतो. जोराच्या व सततच्या पावसाने संख्या कमी होते. ह्या किडीचा प्रादुर्भाव आगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून सर्वाधिक आढळतो.

**पांढरी माशी:** पांढरी माशी १ ते २ मिमी लांब, रंगाने पिवळसर, पांढरट असून पंख पांढऱ्या किवा करड्या रंगांचे असतात. या किडीचे पिल्ले, प्रौढ पानाच्या खालच्या बाजूस राहून पानातील रस शोषण करतात, त्यामुळे पाने कोमेजतात व मलूल होतात. माशी आपल्या शरीरातून एक प्रकारचा चिकट पदार्थ बाहेर टाकते त्यामुळे पानावर काळी बुरशी चढून अन्न तयार करण्याची प्रक्रिया थांबते. त्यामुळे कपाशीच्या उत्पादणात आणि प्रतीवरही अनिष्ट परिणाम होतो. ह्या किडीचा प्रादुर्भाव आक्टोबर महिण्यापासून ते नोव्हेंबर अखेर जास्त आढळतो. कमी पर्जन्यमान व अधिक तापमान ह्या किडीच्या वाढीस पोषक आहे. अधिक पाऊस व ढगाळ वातावरणात किडीची संख्या कमी होते.

### आर्थिक नुकसानीची पातळी:

- फुलकिडे: सरासरी १० फुलकिडे प्रती पान
- पांढरी माशी: सरासरी ८ ते १० प्रौढ माशा किंवा २० पिल्ले प्रती पान

### एकात्मिक व्यवस्थापन:

- कपाशीचा खोडवा घेण्याचे टाळावे.
- कपाशीमध्ये किडी खाणाऱ्या पक्षांना आकर्षित करण्यासाठी भगर हे मिश्र पीक घ्यावे आणि त्यासाठी हेक्टरी २५० ग्रॅम बियाणे वापरावे. कापसाच्या शेताभोवती मक्का, झेंडू, एरंडी, चवळीची लागवड करावी.
- कपाशीच्या कुळातील ( भेंडी, अंबाडी) किंवा ज्या पिकावर कपाशीवरील किडी उपजीविका करतात (टोमॅटो, तूर, हरभरा इ. ) अशी पिके कपाशीपूर्वी किंवा नंतर घेऊ नयेत.
- कपाशीची शेवटची वेचणी संपल्याबरोबर लगेचच शेतात जनावरे किंवा शेळ्या, मेढ्या चरण्यासाठी सोडाव्यात, म्हणजे त्या कपाशीच्या झाडावर असलेली बोंडे, पाने इ. खातील व त्यामध्ये असलेल्या किडी/रोगाच्या अवस्थाचा नायनाट होईल.
- पिवळे चिकट सापळे कपाशीच्या शेतामध्ये लावावेत.
- कपाशीची धसकटे, पालापाचोळा जमा करून कपोस्ट खडयात टाकावा.
- उन्हाळ्यामध्ये जमिनीची खोल नागरणी करावी, त्यामुळे जमिनीत असणाऱ्या किडी च्या अवस्था वर येवून उन्हाने मारतील किंवा पक्षी त्यांना टिपून खातील.
- शिफारस केल्याप्रमाणे कपाशी पिकाची लागवड २० मे नंतर करावी.
- कपाशीचे तंतुविरहित, प्रमाणित बियाणे पेरणीसाठी वापरावे. पेरणीपुर्वी बियाण्यास कॅप्टन ३ ग्रॅम किंवा कार्बेंडझिम ५० टक्के पा.मी./किग्रॅम बियाणे याबरोबरच इमिडक्लोप्रिड ७० टक्के पा.मी. ५-७ ग्रॅम/किलो बियाणे यांची बिजप्रक्रिया करावी.
- मृद परीक्षणाच्या आधारावर खताच्या मात्रेचा अवलंब करावा, रस शोषण करणाऱ्या तसेच बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून जास्तीच्या नत्र खताचा वापर टाळावा.
- शिफारशीनुसार दोन ओळीतील व दोन झाडातील अंतर ठेवावे.
- कपाशीवरील किडीच्या नैसर्गिक शत्रू किटकाचे संवर्धन होण्यासाठी मक्का, चवळी, उडीद, मूग यासारखी अंतरपिके/मिश्रपिके अथवा कपाशी पिकाभोवती घ्यावीत.
- वेळेवर अंतर मशागत करून पीक ८-१० आठवडे तणविरहित ठेवावे, त्यामुळे किडीचे पर्यायी खाद्य असलेल्या तणाचा उदा. पेटारी, पांढरीफुली, धोत्रा, अंबाडी, कोळशी, हॉलीहॉक इत्यादीचा नाश होईल.
- लेडीबर्ड बीटल (ढालकिडा) या किटकाचे प्रौढ भुंगे व अळया प्रामुख्याने मावा किडीवर जगतात, म्हणून पिकावर मावा किडिसोबत लेडीबर्ड बीटल पूरेश्या प्रमाणात आढळून आल्यास रासायनिक कीटकनाशकाचा वापर टाळावा.
- कपाशीवरील किडीचे नैसर्गिक क्षत्रू उदा. सिरफीड माशी, पेंटाटोमिड ढेकूण, कातीन, भुंगे, ड्रगनफ्लाय, हॉबरमाशी, गांधीलमाशी, प्रार्थनाकीटक, टचीनिडमाशी इ. चे संवर्धन करावे.
- किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडताच शिफारशीनुसार कीटकनाशकाची फवारणी करावी. पावर पंपासाठी मात्रा तीनपट वापरावी.
- फुलकिडे: ४ ग्रॅम असिटामेप्रीड २० टक्के किंवा ४ ग्रॅम थायामिथाक्झाम २० टक्के किंवा २० मी.ली. फिप्रोनिल ५ टक्के किंवा २० मी.ली. बुप्रोफेझीन २०% प्रती १० ली. पाणी
- पांढरी माशी: १० मी.ली. बुप्रोफेझीन २५% एस.सी. किंवा २० मी.ली. पायरीप्रोक्सीफेन१०% इसी प्रती १० ली. पाणी

(संपर्क: +९१ ९४२०४५९८०८)

★ ★ ★